
# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती

संलग्नित

एज्युकेशन सोसायटी यवतमाळ द्वारा संचालित

# लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## इतिहास अभ्यास मंडळ व वाणिज्य अभ्यास मंडळ अंतर्गत सर्वेक्षण प्रकल्प अहवाल



# स्त्री पुरुष समानता व स्त्री सुरक्षा : वास्तव आणि अपेक्षा

सत्र २०२०-२१

# लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ
# आय.क्यू.ए.सी.
# इतिहास अभ्यास मंडळ व वाणिज्य अभ्यास मंडळ
# सर्वेक्षण अहवाल प्रस्तुतीकरण

प्रमाणित करण्यात येते की लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील इतिहास व वाणिज्य विभागातर्फे क्षेत्र अध्ययन प्रकल्प अंतर्गत **स्त्री पुरुष समानता व स्त्री सुरक्षा वास्तव आणि अपेक्षा** या विषयावर सर्वेक्षण प्रकल्प महाविद्यालयास सादर करण्यात आला आहे. प्रस्तुत सर्वेक्षण कार्य ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करण्यात आले असून 1000 सर्वेक्षण कर्त्यांच्या तथ्य संकलनातून अहवालाचे प्रस्तुतीकरण करण्यात आले आहे. महिला सक्षमीकरण आणि स्त्री पुरुष समानता या अनुषंगाने औपचारिक व अनोपचारिक चर्चेतून सदर विषयावर प्रकाश टाकण्यासाठी सर्वेक्षण प्रकल्प हाती घेण्यात आला. इतिहास व वाणिज्य विभाग मार्फत घेण्यात आलेल्या या समाजाभिमुख सर्वेक्षण कार्याच्या माध्यमातून तयार केलेल्या अहवालातील सूचना भविष्यासाठी दिशानिर्देशक ठरतील असा विश्वास आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ कविता तातेड<br>इतिहास विभाग | प्रा सौरभ वगारे<br>वाणिज्य विभाग | डॉ दुर्गेश कुंटे<br>प्राचार्य |

## प्रस्तावना :

एकविसाव्या शतकातील तांत्रिक प्रगतीच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रवाहात स्त्री पुरुष समानता व स्त्री सुरक्षितता हा विषय सर्वेक्षण प्रकल्पासाठी निवडलेला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी हे भविष्यातील सुजाण नागरिक असून त्यांच्याशी समूह चर्चेतून अनौपचारिक पद्धतीने चर्चा करून सर्वेक्षण प्रश्नावली तयार करण्यात आली. शिक्षक, विद्यार्थिनी पालक व पाल्य यांच्यात स्त्री-पुरुष समानता व स्त्री सुरक्षा याबाबत जनजागृतीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. भारतीय राज्यघटनेतील समानता बंधुता आणि प्रदत्त अधिकाराचा विचार करता सामाजिक स्तरावर कोणत्याही आधारावर भेद न करता समान अर्थाने समता प्रस्थापित होणे अपेक्षित होते. मात्र वास्तविक चित्र यापेक्षा वेगळे दिसत असल्याने महिला सक्षमीकरणाचा वारंवार उद्घोष होत असूनही स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे या दृष्टीने समाजाभिमुख उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण प्रकल्पाच्या माध्यमातून समाज मन जाणून घेण्याचा इतिहास व वाणिज्य विभागाने हा प्रयत्न केलेला आहे.

## पार्श्वभूमी :

लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय यवतमाळ जिल्ह्यातील प्रथम महिला महाविद्यालय म्हणून प्रसिद्ध असून महिला सक्षमीकरणाच्या विविध उपक्रमातून स्त्री पुरुष समानता आणि स्त्री सुरक्षिततेचे तत्व जोपासले जाते. शिक्षणातून सक्षमीकरण आणि स्वावलंबन हे ध्येय साकार करण्यासाठी महाविद्यालयाने **Head, Heart and Hand** या त्रिसूत्री मध्ये आपल्या उद्दिष्टांना परिपूर्ण करण्याचा सतत प्रयत्न केला आहे. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थिनींना शहरी वातावरणात समायोजित करण्यासाठी त्यांचा विचार शक्तीला चालना देण्यासाठी **स्त्री पुरुष समानता व स्त्री सुरक्षा वास्तव आणि अपेक्षा** हा सर्वेक्षण प्रकल्प घेण्यात आला. सर्वेक्षणासाठी मौखिक चर्चे बरोबर ऑनलाइन प्रश्नावली तयार करण्यात आली. प्रश्नावलीच्या माध्यमातून बहुपर्यायी प्रश्नातून मत जाणून घेण्यात आले. यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी हा गट विशेषकरून निवडण्यात आला.

## अध्ययन समस्या :

सामाजिक सर्वेक्षण व संशोधन करताना विशिष्ट समस्या डोळ्यासमोर ठेवून सर्वेक्षण केले जाते त्यालाच अध्ययन विषयाची निवड असेही म्हणता येईल. यासाठी चर्चा करण्यात येऊन सर्व प्रथम प्रासंगिक आणि उद्देश पूरक विषय निवडण्यात आला. भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान भूमिका व दर्जा हा विषय सतत परिवर्तनशील राहिला आहे. समाजात स्त्री-पुरुष समानता वरकरणी दिसत असली तरी वास्तविक परिस्थिती मात्र समरूप नाही. ग्रामीण व शहरी भागातील स्त्री पुरुष समानतेचे मधील अंतरही चिंताजनक आहे. स्त्री सुरक्षेबाबत अशा कल्पना व वास्तव यात बरेच अंतर आहेत. या सर्वांचा उहापोह करण्यासाठी स्त्री पुरुष समानता व स्त्री सुरक्षा वास्तव आणि अपेक्षा हा विषय संशोधन समस्या सूत्र म्हणून घेण्यात आला.

## गृहीतकृत्ये/ उपकल्पना :

कायद्याने स्त्री पुरुष समानता असली तरी वास्तविक समानता नाही त्यासाठी परिवर्तन अपेक्षित आहे . स्त्री सुरक्षा सक्षमीकरणासाठी सामाजिक मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे . पालक-पाल्य ,शिक्षण संस्था यांच्यात समन्वय होणे अपेक्षित आहे. प्रसारमाध्यमांनी स्वीकारलेली स्त्री प्रतिमेबद्दल ची एकांगी भूमिका बदलणे गरजेचे आहे . स्वतः महिलांमध्ये याबाबत सकारात्मक परिवर्तन होणे आवश्यक आहे.

## अध्ययन क्षेत्र व व्याप्ती :

प्रस्तुत अध्ययन हे महिला सुरक्षा व स्त्री पुरुष समानता यावर केंद्रित आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे मत ही अध्यायांची व्याप्ती असून प्रसारमाध्यमे ,महिला सुरक्षा सेल ,शैक्षणिक संस्था ,पालक आणि स्वतः महिला घटक यांच्या भूमिकेचे विश्लेषण या माध्यमातून केले जाणार आहे.

## अध्ययन आराखडा :

प्रस्तुत सर्वेक्षणात आराखड्याचे स्वरूप बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या स्वरूपात असून अध्ययन निरीक्षणात्मक व वर्णनात्मक आहे त्यामध्ये महिला सुरक्षा जाणीव-जागृतीचे माध्यम, ग्रामीण व शहरी भागातील स्त्रियांच्या समस्या, महाविद्यालयांची यासंदर्भातील जबाबदारी, प्रसारमाध्यम स्त्री जीवनाचे होणारे चित्रण, समाजाची भूमिका व सर्वेक्षण करण्याचे व्यक्तिगत मत विचारात घेतले आहे.

## नमुना निवड :

प्रस्तुत सर्वेक्षणात एककाची निवड करताना ग्रामीण व शहर भागातील स्त्रिया, पालक ,महाविद्यालय या एकका मार्फत निवड पद्धतीने व्यवस्थाबद्ध नमुना निवड अंतर्गत नियमित अंकन तंत्राच्या साह्याने उत्तर दात्यांची निवड करण्यात आली.

## तथ्य संकलन पद्धती :

सर्वेक्षणाचे अध्ययन करताना प्रश्नावली पद्धतीच्या सहाय्याने महाविद्यालयीन घटकांकडून तथ्य संकलन करण्यात आले. Covid-19 च्या पार्श्वभूमीवर सर्वेक्षणाचा कालावधी मर्यादित असल्याने प्रश्नावली पद्धतीचा वापर करण्यात आला त्याशिवाय प्रकाशित व अप्रकाशित अहवाल वृत्तपत्र ,सामाजिक माध्यमे ,यापासून संकलित केलेल्या तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून तथ्य संकलन करताना बहुपर्यायी प्रश्नांना मिळालेल्या प्रश्नांचा आधार घेण्यात आला.

## तथ्य प्रक्रियन:

सर्वेक्षणातून प्राप्त माहिती तपासण्यात आली त्यामध्ये काही त्रुटी होत्या त्या भ्रमणध्वनी तील मेसेजच्या माध्यमातून दूर करण्यात आल्या. शिक्षक ,काही पालक ,दामिनी पथकाच्या पदाधिकारी ,प्रसारमाध्यम क्षेत्रातील लोकांशी याबाबत चर्चा करण्यात आली

## संपादन :

प्राप्त झालेली माहितीचे  संस्करण केल्या गेले आहे .

## वर्गीकरण :

सर्वेक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या माहिती गटात  बसवून त्याचे वर्गीकरण केले आहे .

## संकेतीकीकरण  :

तथ्यांचे वर्गीकरणानंतर त्याचे विशिष्ट स्वरूपात सांख्यिकी करण केले आहे.

## संकेत पुस्तिका :

ऑनलाईन अहवाल

## तथ्य विश्लेषण व निर्वाचन :

प्राप्त तथ्यांवर प्रक्रिया केल्यानंतर तथ्यांचे निर्वाचन केले आहे. त्यासाठी प्रत्येक तःत्यामधील कार्यकारण भाव शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

## गृहित कृत्यांची पडताळणी :

प्रस्तुत अध्ययन पूर्ण झाल्यानंतर उपकल्पना यांची पडताळणी करण्यात आली आहे.

## मास्टर चार्ट :

उत्तर दात्यांची सर्व प्रश्नांची उत्तरे एका दृष्टिक्षेपात बघता यावी यासाठी मास्टर चार्ट तयार केले आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | स्त्री पुरुष समानते बद्दल तुमचे मत काय ? | स्त्री पुरुष समानता आहे | स्त्री पुरुष समानता नाही | कायद्याने समानता आहे पण वास्तविक समानता नाही | समानते बद्दल निश्चित सांगता येत नाही |
| | | **316** | **82** | **747** | **109** |
| 2 | महिला सुरक्षे बाबत समाजाचे काय योगदान असावे ? | स्त्रीयांना सक्षम बनवावे | कायद्या मध्ये बदल करावा | सामाजिक मानसिकता बदलावी | आहे तसे वातावरण योग्य आहे |
| | | **630** | **115** | **648** | **14** |
| 3 | मुलींच्या सुरक्षिततेसाठी पालकांनी कोणती काळजी घेणे अपेक्षित आहे. | मुलींना घराबाहेर पाठवू नये | पालकांनी त्यांच्या सोबत राहावे | मुलींना आत्मसुरक्षिततेसाठी प्रशिक्षण द्यावे | पालकांनी सामुहिक जनजागृती करावी |
| | | **12** | **38** | **985** | **301** |
| 4 | प्रसार माध्यमांची महिला सुरक्षिततेबाबत काय भूमिका असावी ? | प्रसिद्धी कार्यक्रमातून सकारात्मक बातम्या देणे | सुरक्षिततेबाबत समाजात जनजागृती करणे | दोषी घटकांबाबत आवाज उठवावा | |
| | | **280** | **630** | **577** | |
| 5 | महिला सुरक्षा सेल (दामिनी पथक ) ची काय भूमिका असावी ? | स्त्रीयांना सुरक्षितता मिळवून देणे | अपराध्यांना कडक शासन करणे | पालकांना जागरूक करणे | पिडीत मुलींना कायदेशीर न्याय मिळवून देणे |
| | | 406 | 493 | 198 | 657 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | **महाविद्यालायामार्फत महिला सुरक्षा जाणीव जागृती कशी राबविता येईल ?** | स्त्री पुरुष समानते बाबत जागरूकता अभियान राबविणे | स्त्री सुरक्षिततेबाबत आवश्यक उपाय योजना करणे | महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करणे | | |
| | | **512** | **454** | **533** | | |
| 7 | **ग्रामीण स्तरावर महिला सुरक्षिततेच्या कोणत्या समस्या जाणवतात** | सुरक्षितते बाबत जागरूकता नाही | ग्रामीण भागातील स्त्री सुरक्षित आहे | कायद्या बद्दल माहिती नाही | पिडीतेला चूप राहण्यास भाग पडले जाते | |
| | | **403** | **102** | **440** | **602** | |
| 8 | **शहरी स्तरावर महिला सुरक्षिततेच्या कोणत्या समस्या जाणवतात** | कायद्या बद्दल जागरूकता नाही | शहरातील वातावरण सुरक्षिततेला पोषक नाही | पोलीस यंत्रणेवर सुरक्षिततेबाबत अतिरक्त दबाव असतो | शहरातील महिला पूर्णपणे सुरक्षित आहे | |
| | | **244** | **611** | **411** | **67** | |
| 9 | **स्वतःच्या सुरक्षे च्या बाबतीत महिला काय करू शकते** | कायद्याचे व सुरक्षिततेचे ज्ञान प्राप्त करणे | संकट प्रसंगी आत्मविश्वासाने सामना करणे | महिला म्हणून इतर महिलांना प्रेरित करणे | फक्त स्वतःच्या सुरक्षे चा विचार करणे | |
| | | **359** | **793** | **519** | **41** | |
| 10 | **महिला सुरक्षा जाणीव जागृतीचे उत्कृष्ट व प्रभावी मध्यम काय असेल?** | प्रेस आणि इलेक्ट्रोनिक मिडिया | शैक्षणिक व सामाजिक संस्था | केंद्र व राज्य सरकार द्वारा संचालित शासकीय संस्था. | सार्वजनिक व सामाजिक कार्यक्रम | कायद्याची प्रभावी अंबलबजावणी |
| | | **345** | **471** | **311** | **397** | **419** |

## अहवाल प्रस्तुतीकरण :

दिलेल्या प्रश्नांचे सर्वेक्षणात्मक प्रतिशतता च्या आधारे अहवाल तयार करण्यात आला व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले आहे.

## निष्कर्ष :

- भारतीय संविधानातील समता प्रस्थापित करण्याचे ध्येय समाजात रुजवायचे असेल तर सामाजिक जनजागृतीची गरज आहे त्यासाठी शिक्षण संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, शासकीय यंत्रणा यांच्यात समन्वय असणे अपेक्षित आहे.

- सामाजिक समानता ही फक्त कायद्याने अमलात आणली जाऊ शकत नाही त्यासाठी समाजातील घटकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे सार्वजनिक माध्यमातून पालक मेळावे ,कार्यशाळा, चर्चासत्र विचारमंथनाचे उपक्रम घेतल्यास सकारात्मक परिवर्तन घडून येईल.

- कुटुंबात किंवा सार्वजनिक स्थानी लिंगभेद होत असेल तर समाजातील प्रत्येक घटकाने त्याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे .स्त्रियांची कौटुंबिक भूमिका तिचा सामाजिक दर्जा याबाबत चाकोरीबद्ध चौकटीतून बाहेर पडून ती सुद्धा मानव आहे हा विचार आधी होणे आवश्यक आहेत.

- एकविसावे शतक समानतेचे या उद्देशाने संस्कारातून सक्षमीकरण करावे म्हणजेच प्रस्थापित समाजव्यवस्थेचा समभाव विकसित होईल त्यासाठी स्वतः स्त्रियांनी दुर्बलतेचा भाव किंवा अनामिक भीतीचा त्याग करावा.

- प्रसार माध्यमातून बहुदा स्त्री जीवन किंवा व्यक्तिमत्वाचे एकांगी स्वरूप प्रकट होते त्यामुळे स्त्रीची भूमिका व समाजाकडून तिच्याबद्दलच्या अपेक्षा याबाबत संभ्रम निर्माण होतो स्त्री-पुरुष सहजीवन प्रत्यक्षात किती आशादायी असू शकेल याबाबत प्रसारमाध्यमांनी सजगता दर्शवावी.

- स्त्री सुरक्षा अधिकार विषयक कायदे व त्यांची अंमलबजावणी यामध्ये जी दरी निर्माण झाली आहे ती कमी करून कायद्याचे पालना बद्दल स्त्री व पुरुष दोघांनाही जागृत असणे अपेक्षित आहेत उदाहरणार्थ कौटुंबिक हिंसाचार कायदा अस्तित्वात येऊनही स्त्रीवर अत्याचार होत असल्याचे वास्तव्य आहेत म्हणून कागदावरची शोभा असणारे कायदे प्रत्यक्षात अमलात आणता येतील या दृष्टीने सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

- स्वतः स्त्रियांनी मुलींनी आपली शक्ती ओळखून दुय्यमपणाच्या धोरणाचा विरोध करावा परंपरेने चालत असणाऱ्या प्रथांचा स्त्रिया जेव्हा स्वीकार करतात तेव्हा त्यातील तथ्य व वास्तविकता समजून घ्यावी म्हणजे स्त्रियांच्या भूमिकेचे व दर्जाचे निर्धारण करण्याचा अधिकार पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मिळेल व समतुल्य निर्माण होईल.

• पालकांची स्त्री पुरुष समानतेसाठी विशेष जबाबदारी आहे कुटुंबात होणारे लिंगभेद मुलगी परक्याचे धन म्हणून केला जाणारा विचार त्यागणे गरजेचे आहेत बालपणापासून मुलीला सुरक्षा व आत्मनिर्भर ते चे धडे दिले गेले पाहिजे.

• महिला सुरक्षा सेल कायदेशीर रित्या उत्कृष्ट कार्य करीत आहे समाजातील वाईट प्रवृत्तीला रोखण्यासाठी सामाजिक जनजागृती चे माध्यम ही ते स्वीकारू शकतात महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी दामिनी पथकाच्या कार्य क्षमतेबद्दल समाधान व्यक्त केलेले दिसते.

• दुर्बल किंवा उपेक्षित घटक समजून जेव्हा स्त्रीवर शारिरीक व मानसिक अत्याचार केले जातात त्या प्रसंगी न घाबरता त्यांचा प्रतिकार करण्याची क्षमता स्त्रियांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात निर्माण करावी कुटुंबातील व समाजातील स्त्री व पुरुष यांच्या कार्य विभागणी तील अंतर कमी करणे हा समानता प्रस्थापित करण्याचा न्याय मुक्ती उपाय आहे.

• सामाजिक सार्वजनिक व शैक्षणिक संस्थांमधून पुढील उपक्रम राबविता येऊ शकतात

1. स्त्री आरोग्याचे संवर्धन करण्यासाठी निश्चित उपाय योजना करणे .

2. पीडित स्त्रीला बंदिस्त न करता तिला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे व मानसिक क्षमता टिकवण्यासाठी सहकार्य करणे.

3. स्त्री शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करणे .

4. स्त्री अत्याचार किंवा छेडखानी ची घटना घडल्यास पालकांनी मुलींना धीर देणे ती चुकलेली नाही हे समजून घेणे अनिवार्य आहे .

5. छेडछाड करणे हा मुलाचा अधिकार नाही किंवा छेडछाड सहन करणे हे मुलीचे कर्तव्य नाही ही भावना समाजात समजल्यास समानता निर्माण होण्यास योग्य वातावरण तयार होईल .

6. साहित्य हे सामाजिक जनजागृतीचे प्रभावी साधन असल्याने साहित्य व स्त्रीजीवन यातूनही स्त्रियांचे दुय्यम स्थान बदलण्याकरिता संदर्भ दिला जाऊ शकतो फक्त संदेशच नव्हे तर मृत कृती रूपाने पुढे येण्याची संधी स्त्रियांना मिळाली पाहिजे .

7. कार्यालय शैक्षणिक संस्थांमध्ये समानतेचा विरोध करणाऱ्या घटना घडल्यास अनुशासन आत्मक कार्यवाही त्वरित होणे गरजेचे आहे.

8. शैक्षणिक संस्थांमध्ये तक्रार निवारण समिती अनुशासन व समुपदेशन समिती स्थापन करणे आवश्यक आहे .

9. पालक व पाल्य यांच्यातील वैचारिक अंतर कमी करून महाविद्यालयांनी पालकांच्या जागृतीसाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे त्यासाठी संचालक प्राचार्य शिक्षक विद्यार्थी व पालक यांच्यात समन्वय निर्माण करणारी यंत्रणा उभारणे अपेक्षित आहे.


10. कुठेही स्त्रियांवर अत्याचार किंवा छेडछाड झाल्यास प्रसंगी न घाबरता त्याचा प्रतिकार करण्याची क्षमता आपल्या व्यक्तीमत्वात निर्माण करावी आपण अन्याय सहन करणार नाही हा विचार प्रत्येक मुलीच्या मनावर बिंबविण्यासाठी स्त्री व्यक्तिमत्व सक्षम होणे अनिवार्य आहे.


## प्रतीज्ञा

भारत माझा देश आहे
सारे भारतीय माझे बांधव आहे
माझ्या या देशात स्त्री पुरुष समानता नांदावी
या साठी मी सदैव प्रयत्न करेन
स्त्री हि महान शक्ती आहे
ती अनंत काळाची माता आहे
मुलगा वंशाचा दिवा असेल तर मुलगी वंशाची पणती आहे
तिचा आदर सन्मान मनापासून करणे
हे माझे कर्त्यव्य आहे
मी हुंडा देणार नाही, घेणार नाही
मी स्त्री भृणहत्या करणार नाही , करू देणार नाही
मी स्त्री जन्माचे सदैव स्वागत करेन
अशी प्रतीज्ञा मी सर्वांच्या समोर घेत आहे
भारत माता की जय
वन्दे मातरम्

प्रत्येक व्यक्तीने या प्रतीज्ञेचे पालन केल्यास समाजातील स्त्री पुरुष समानतेवर निर्माण होणारे प्रश्नचिन्ह मिटण्यास मदत होईल या अपेक्षेने हा अहवाल सदर केल्या जात आहे .


| | | |
|---|---|---|
| डॉ कविता तातेड<br>इतिहास विभाग | प्रा सौरभ वगारे<br>वाणिज्य विभाग | डॉ दुर्गेश कुंटे<br>प्राचार्य |






स्त्री पुरुष समानते बद्दल तुमचे मत काय ?
1,124 responses
स्त्री पुरुष समानता आहे
316 (28.1%)
स्त्री पुरुष समानता नाही
82 (7.3%)
कायद्याने समानता आहे पण वास्तविक समानता...
747 (66.5%)
समानते बद्दल निश्चित सांगता येत नाही
109 (9.7%)
0
200
400
600
800







महिला सुरक्षे बाबत समाजाचे काय योगदान असावे ?
1,124 responses
स्त्रीयांना सक्षम बनवावे
630 (56%)
कायद्या मध्ये बदल करावा
115 (10.2%)
सामाजिक मानसिकता बदलावी
648 (57.7%)
आहे तसे वातावरण योग्य आहे
14 (1.2%)
0
200
400
600
8





मुलींच्या सुरक्षिततेसाठी पालकांनी कोणती काळजी घेणे अपेक्षित आहे.
1,124 responses
मुलींना घराबाहेर पाठउ नये
12 (1.1%)
पालकांनी त्यांच्या सोबत राहावे
38 (3.4%)
मुलींना आत्मसुरक्षिततेसाठी प्रशिक्षण द्...
985 (87.6
पालकांनी सामुहिक जनजागृती करावी
301 (26.8%)
0
250
500
750
1,000




प्रसार माध्यमांची महिला सुरक्षिततेबाबत काय भूमिका असावी ?
1,124 responses
प्रसिद्धी कार्यक्रमातून सकारात्मक बातम्...
280 (24.9%)
सुरक्षिततेबाबत समाजात जनजागृती करणे
630 (56%)
दोषी घटकांबाबत आवाज उठवावा
577 (51.3%)
200
400
600
8


महिला सुरक्षा सेल (दामिनी पथक ) ची काय भूमिका असावी ?

1,124 responses





महाविद्यालायामार्फत महिला सुरक्षा जाणीव जागृती कशी राबविता येईल ?

1,124 responses









ग्रामीण स्तरावर महिला सुरक्षिततेच्या कोणत्या समस्या जाणवतात
1,124 responses
सुरक्षितते बाबत जागरूकता नाही
403 (35.9%)
ग्रामीण भागातील स्त्री सुरक्षित आहे
102 (9.1%)
कायद्या बद्दल माहिती नाही
440 (39.1%)
पिडीतेला चूप राहण्यास भाग पडले जाते
602 (53.6%)
0
200
400
600
800







शहरी स्तरावर महिला सुरक्षिततेच्या कोणत्या समस्या जाणवतात
1,124 responses
कायद्या बद्दल जागरूकता नाही
244 (21.7%)
शहरातील वातावरण सुरक्षिततेला पोषक नाही
611 (54.4%)
पोलीस यंत्रणेवर सुरक्षिततेबाबत अतिरक्त ...
411 (36.6%)
शहरातील महिला पूर्णपणे सुरक्षित आहे
67 (6%)
200
400
600
8








0

Vaibhav P Mujumle (v4vaibhavomujmule@gmail.com) (9921589471)